# महाराष्ट्र विधानपरिषद

## तिसरे अधिवेशन, २०२४

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**शुक्रवार, दिनांक १२ जुलै, २०२४ / आषाढ २१, १९४६ (शके)**

| | |
|---|---|
| **(१) अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** | |
| **(२) उच्च व तंत्र शिक्षण, वस्त्रोद्योग, संसदीय कार्ये मंत्री** | |
| **(३) सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** | |
| **(४) सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** | **यांचे प्रभारी विभाग** |
| **(५) अल्पसंख्यांक विकास व औकाफ, पणन मंत्री** | |
| **(६) शालेय शिक्षण, मराठी भाषा मंत्री** | |
| **(७) अन्न व औषध प्रशासन मंत्री** | |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - २०**

---

### अन्न व औषध प्रशासनाकडून कोट्यवधी रुपयांची बनावट औषधे जप्त करण्यात आल्याबाबत

**(१) * २३४२२ श्रीमती उमा खापरे, श्री.चंद्रशेखर बावनकुळे, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.रमेशदादा पाटील, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.निलय नाईक, श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे, प्रा.राम शिंदे, श्री.सचिन अहिर :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अन्न व औषध प्रशासनाकडून माहे एप्रिल ते ऑक्टोबर, २०२३ मध्ये कारवाई करुन सुमारे २.८५ कोटी रुपयांची बनावट औषधे जप्त करण्यात आल्याचे माहे जानेवारी, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास तेलंगणा येथील औषध कंपनीच्या तक्रारीची दखल घेत कॅन्सर विरोधातील बनावट इंजेक्शन बाजारात आणल्या प्रकरणी अन्न व औषध प्रशासनाकडून अनेक औषध कंपन्यांविरुध्द कारवाई करण्यात आली असून सदर कारवाईचा अहवाल शासनास प्राप्त झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त अहवालाच्या अनुषंगाने बनावट औषधे व इंजेक्शन बाजारात विक्रीसाठी उपलब्ध करुन देणाऱ्या संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.धर्मरावबाबा आत्राम :** (१) होय, हे अंशतः खरे आहे.

(२) व (३) मे. हेट्रो हेल्थकेअर लि. हैद्राराबाद, तेलंगणा या उत्पादकाचा CIZUMAB 400 इंजेक्शन, समुह क्र. BB2311A या औषधाचा बनावट असलेल्या साठ्याची विक्री बाजारात होत असल्याची गोपनीय माहिती माहे जानेवारी, २०२४ च्या सुमारास प्राप्त झाली होती. त्यानुषंगाने, बनावट औषधांचा अन्न व औषध प्रशासनाद्वारे शोध घेतला असता सदर औषधांच्या ०३ व्हाईल्स मे. लाईफक्युरा फार्मा, चेंबूर पूर्व, मुंबई यांचेकडून प्राप्त झाल्या असून त्यापैकी ०२ व्हाईल्स अनौपचारीकरित्या चाचणसाठी शासकीय विश्लेषक, औषध नियंत्रण प्रयोगशाळा, मुंबई यांच्याकडे पाठविण्यात आले आहेत. तसेच, ०१ व्हाईल ची तुलना उत्पादक यांच्या उत्पादनावेळी ठेवण्यात आलेल्या Control Sample सोबत केली असता मे. लाईफक्युरा फार्मा, चेंबूर पूर्व, मुंबई यांच्याकडील उपलब्ध औषध बनावट असल्याचे आढळून आले आहे. या प्रकरणी संबंधिताविरुध्द औषधे व सौंदर्य प्रसाधने कायदा, १९४० या अंतर्गत गोवंडी पोलीस स्टेशन, गोवंडी, मुंबई येथे प्रथम खबर अहवाल (FIR) क्र.००६८, दिनांक १२/०३/२०२४ रोजी दाखल करण्यात आला आहे. उपरोक्त बनावट औषध खरेदी विक्री करणाऱ्या मे.के डेक्कन हेल्थकेअर वाडीया कॉलेज जवळ, पुणे या पेढीचे परवाने रद्द करण्यात आले आहेत. तसेच, इतर संबंधित औषध विक्रेत्यांसंदर्भात कार्यवाही सूरू आहे.

या प्रकरणी पोलिसांसोबत पुढील तपास सुरू आहे. तपासणी अंती संबंधितांविरुध्द औषधे व सौंदर्य प्रसाधने कायदा, १९४० अंतर्गत मा.न्यायालयात खटला दाखल करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अंधेरी (मुंबई) येथील शासकीय भुखंडावर विकासकाने अनधिकृत बांधकाम केल्याबाबत

**(२) * २३६३१ श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.जयंत आसगावकर, श्री.अभिजित वंजारी, श्री.धीरज लिंगाडे, श्री.सुधाकर अडबाले, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.राजेश राठोड, डॉ.वजाहत मिर्झा :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासकीय मध्यवर्ती मुद्रणालयातील कामगारांच्या घरांसाठी अंधेरी (पश्चिम) येथे वितरीत करण्यात आलेला शासकीय भूखंड शासनाने एका विकासकाला ९ वर्षांपूर्वी ‘उद्योग भवन’ उभारण्यासाठी दिला असून, सदर विकासकाने या भूखंडावर अद्यापपर्यंत ‘उद्योग भवन’ ची इमारत उभारली नसल्याची बाब दिनांक ५ एप्रिल, २०२४ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू शासकीय भूखंडावर विकासकाने तीन इमारतींचे बांधकाम करुन त्यातील सदनिकांची खुल्या बाजारात विक्री केल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू भूखंडावर ‘उद्योग भवन’ची इमारत उभी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली तसेच सदरहू भूखंडावर ‘उद्योग भवन’ उभारणीस दिरंगाई करणाऱ्या संबंधित विकासकांविरुध्द कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.रविंद्र चव्हाण :** (१) (अ) विषयांकित प्रकल्पास दिनांक ०५/०८/२००८ रोजीच्या मंत्रिमंडळ पायाभूत समितीच्या बैठकीतील निर्णयानुसार मंजुरी प्राप्त असून खुल्या निविदेद्वारे विकासकातर्फे देकार मागविण्यात

आले असून मे. आकृती सिटी लि. मुंबई (सद्याचे नाव मे. हबटाऊन प्रा. लि.) या विकासकाच्या निविदेस शासनाकडून मंजुरी प्राप्त झाली आहे.

(ब) दिनांक ०१/११/२००८ रोजीच्या शासन निर्णयानुसार अंधेरी (प), आंबिवली येथील नगर भुमापन क्र. १४१ (अ) या भूखंडाच्या एकूण १८७८५ चौ. मी. क्षेत्रफळापैकी १४,२७० चौ. मी. हा भूखंड विकासकास प्रथम ३० वर्षाच्या कालावधी करता रुपये १/- प्रती चौ. मी. प्रति वर्ष याप्रमाणे भाडेपट्ट्यावर देण्यास मान्यता देण्यात आलेली आहे व पुढे हा कालावधी ३०/३०/९ वर्षासाठी त्यावेळी अस्तित्वात असलेल्या महसूल व वन विभागाच्या याबाबतच्या धोरणानुसार नूतनीकरण करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

(क) सद्य:स्थितीत, अंधेरी (प), आंबिवली सर्व्हे क्र. १४१ (अ) येथील भुखंडावर उद्योग भवन इमारतीच्या अतिक्रमण विरहीत भागातील ७व्या मजल्याचे आर. सी. सी. काम प्रगतीपथावर आहे.

(२) (अ) करारनाम्यातील अटी व शर्तींच्या अधीन राहुन विकासकास त्याने केलेल्या शासकीय बांधकामापोटी सन २०१५ पासून आजतागायत तीन टप्प्यांमध्ये एकूण ८४०० चौ.मी. इतक्या क्षेत्रफळाचा भूखंड ९९ वर्षाच्या भाडेतत्त्वावर देण्यात आलेला आहे.

(ब) करारनाम्यातील अटी व शर्तींनुसार, विकासकास भाडेतत्त्वावर दिलेल्या भुखंडावरील बांधकामाची विक्री करण्याची परवानगी आहे. त्याअनुषंगाने विकासकास भाडेतत्त्वावर दिलेल्या भुखंडावर तीन इमारतीपैकी (तीन टॉवर) इमारत क्र.१ व २ चे काम प्रगतीत आहे. तसेच, इमारत क्र.३ चे बांधकाम अद्याप सुरु झालेले नाही.

(३) (अ) अंधेरी येथील उद्योग भवन येथे सदर भूखंडावर सद्य:स्थितीत १० झोपड्यांचे अतिक्रमण असून इमारतीच्या बेसमेंटच्या कामास अडथळा निर्माण होत आहे. तथापि, सदर भुखंडावर अतिक्रमण विरहीत भागात उद्योग भवन इमारतीच्या सातव्या मजल्याचे आर. सी. सी. काम प्रगतीपथावर आहे.

(ब) तरी, प्रकल्पास विलंब झाल्याने करारनाम्यातील अटी व शर्तींच्या अधीन राहून विकासकाकडुन रुपये ३०,००,०००/- इतकी दंडाची रक्कम वसुल करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यामध्ये कॅफेनचे अतिरिक्त प्रमाण असलेल्या थंड पेयांच्या विक्रीवर बंदी आणण्याबाबत

**(३)** * **२३७६८ श्री.सत्यजीत तांबे :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील नाशिक व मुंबईसह सर्वच शहरी व ग्रामीण भागात एनर्जी पेयांच्या (ड्रिंक्सच्या) नावाखाली कॅफेनचे अतिरिक्त प्रमाण असलेली थंड पेये बाजारात विक्रीसाठी सहज उपलब्ध होत असल्याचे माहे एप्रिल, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एनर्जी पेयांच्या २५० मि.ली. च्या बाटलीत ७५ मि.ली. ग्रॅमपेक्षा जास्त कॅफेन घेऊ नये अशी नोंद असतानाही एनर्जी पेयांमध्ये कॅफेनचे अतिरिक्त प्रमाण असल्याने त्यांच्या सेवनामुळे जास्त नशा येऊन मेंदू, किडनी, मज्जारज्जू यावर विपरीत परिणाम होत असून अस्वस्थता, निद्रानाश, प्रजनन समस्या, उच्च रक्तदाब, लठ्ठपणा व चिडचिडेपणा या व्याधींचा धोका निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर पेये शाळा व महाविद्यालय परिसरात सहज उपलब्ध होत असल्याने त्याचा विपरीत परिणाम नागरिक व विद्यार्थ्यांच्या आरोग्यावर होत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून आरोग्याला हानिकारक अशा अतिरिक्त कॅफेनचे प्रमाण असणाऱ्या एनर्जी पेयांच्या विक्रीवर बंदी घालण्यासंदर्भात कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.धर्मरावबाबा आत्राम :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) हे खरे नाही.

अन्न सुरक्षा व मानके (फूड प्रॉडक्ट्स ॲन्ड फूड ॲडीटिव्हज), २०११ चे नियमन २.१०/०६/२(ii) अन्वये Caffeinated Beverages (Carbonated, Non carbonated) मध्ये कॅफेनचे प्रमाण कमीत कमी १४५ मिली ग्रॅम (mg) प्रति लिटर आणि जास्तीत जास्त ३०० मिली ग्रॅम (mg) प्रती लिटर असावे, अशी तरतूद करण्यात आली आहे. सदर तरतूदीत नमूद केलेल्या प्रमाणापेक्षा अधिक प्रमाणात कॅफेन घेतल्यास अनेक व्याधी होण्याची शक्यता असल्याने अन्न व औषध प्रशासनाकडून संपूर्ण राज्यात, शाळा व महाविद्यालय परिसरात विक्री केल्या जाणाऱ्या एनर्जी ड्रिंक्सचे अन्न नमुने वेळोवेळी विश्लेषणाकरीता घेण्यात येतात.

(४) अन्न सुरक्षा व मानके (फूड प्रॉडक्ट्स ॲन्ड फूड ॲडीटिव्हज), २०११ चे नियमन २/१०/६ अन्वये BEVERAGES NON-ALCOHOLIC अन्न पदार्थांमध्ये caffein या घटक पदार्थांचे प्रमाण निश्चित केले आहे. सदर अन्न पदार्थात caffein हा घटक पदार्थांचे प्रमाण निश्चित केलेल्या प्रमाणानुसार आहे किंवा कसे हे तपासण्यासाठी नियमितपणे अन्न नमुने विश्लेषणासाठी घेतले जातात. त्यानुसार, राज्यात एप्रिल २०२३- मार्च २०२४ या कालावधीत NON-ALCOHOLIC BEVERAGES या अन्न पदार्थांचे एकूण १६२ नमुने विश्लेषणासाठी घेण्यात आले त्यापैकी ०१ अन्न नमुना मिथ्याछाप घोषित केला असून सदर प्रकरणी न्यायनिर्णय खटला दाखल करण्यात येत आहे. सदर कालावधीत NON-ALCOHOLIC BEVERAGES या अन्न पदार्थाचा एकूण १८०० लिटर, किमंत रुपये ३३,१९०/- चा साठा जप्त करण्यात आला आहे.

राज्यात एप्रिल २०२४ ते मे २०२४ या कालावधीत NON-ALCOHOLIC BEVERAGES अन्नपदार्थांचे एकूण ३६ नमुने विश्लेषणासाठी घेण्यात आले असून विश्लेषण अहवाल प्राप्त झाल्यावर नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मराठवाडा विभागातील जिल्हा परिषद शाळांमधील मुख्याध्यापकांची रिक्त पदे भरण्याबाबत

**(४) * २३५९५ श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण : तारांकित प्रश्न क्रमांक १८८३२ ला दिनांक १ ऑगस्ट, २०२३ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात मराठवाडा विभागामध्ये सर्वात जास्त संख्येने असणाऱ्या जिल्हा परिषद माध्यमिक शाळांमध्ये सर्वात जास्त संख्येने मुख्याध्यापकांची वर्ग-२ ची पदे गेल्या अनेक वर्षांपासून रिक्त असून, वर्ग-२ च्या मुख्याध्यापकांना पदावनत करुन वर्ग-३ चा दर्जा दिला असल्याचे माहे एप्रिल, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या सर्व माध्यमिक शाळांसाठी विहीत कालावधीत सर्व भौतिक सोयींयुक्त इमारती बांधण्यासाठी शासनाने कोणता निर्णय घेतलेला आहे, तसेच मराठवाडा विभागातील जिल्हा परिषद माध्यमिक शाळांमधील अद्यापपर्यंत किती रिक्त पदे भरण्यात आली आहेत,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने माध्यमिक शाळांसाठी सर्व भौतिक सोयींयुक्त इमारती बांधण्याबाबत तसेच मुख्याध्यापकांची रिक्त असलेली पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिपक केसरकर :** (१) मुख्याध्यापकांची वर्ग-२ ची पदे अनेक वर्षांपासून रिक्त आहेत ही बाब खरी आहे. तथापि, माहे एप्रिल, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान वर्ग-२ च्या मुख्याध्यापकांना पदावनत करुन वर्ग-३ चा दर्जा दिला असल्याची बाब खरी नाही.
(२) राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या एकूण १५०० शाळांना सुविधा उपलब्ध करुन आदर्श शाळा म्हणून विकसित करावयाचे आहे. "भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आदर्श शाळा योजना" या योजनेंतर्गत पहिल्या टप्प्यात एकूण ४८८ शाळांना आदर्श शाळा म्हणून विकसित करण्यास दिनांक ०५/०३/२०२१ व दिनांक २२/०६/२०२२ रोजीच्या शासन निर्णयांन्वये मान्यता देण्यात आली आहे. तसेच, राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळेतील वर्गांची पुनर्बांधणी व शाळांची दुरुस्ती करण्यासाठी "राजमाता जिजाऊ शैक्षणिक गुणवत्ता विकास अभियान" राबविण्यास दिनांक ०९/०९/२०२१ रोजीच्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांना सुविधा उपलब्ध करुन देणे, वर्ग खोल्यांची दुरुस्ती व पुनर्बांधणी करुन देण्याची कार्यवाही सुरु आहे.

शालेय शिक्षण विभागाच्या आकृतीबंधातून मुख्याध्यापक गट-ब ची पदे वगळण्याबाबतची कार्यवाही सुरु असल्याने सदर पदे भरण्यात आलेली नाहीत.
(३) "भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर आदर्श शाळा योजना" या योजनेंतर्गत लातूर शैक्षणिक विभागात एकूण १९६ (मोठी १६ + छोटी १८०) आदर्श शाळा बांधकामे पूर्ण झाली आहेत. तसेच, छ.संभाजीनगर शैक्षणिक विभागात सदर योजनेंतर्गत एकूण ६४ (मोठी १७ + छोटी ४७) आदर्श शाळा बांधकामे पूर्ण झाली आहेत.

राजमाता जिजाऊ शैक्षणिक गुणवत्ता विकास अभियानांतर्गत निजामकालीन शाळांच्या दुरुस्ती व बांधकामासाठी रुपये २०० कोटींची कामे हाती घेण्यात आली आहेत. तसेच, आवश्यकतेनुसार जिल्हा परिषद सेस फंड, जिल्हा नियोजन समिती, जिल्हा खनिज निधी, १५ वा वित्त आयोग, आमदार-खासदार निधी, सी.एस.आर. फंड, समग्र शिक्षा अभियान, VSTF (Village Social Transformation Fund)-ग्रामविकास विभागाकडील न्यास, देवस्थानांकडील देणग्या व शाळा दत्तक योजना इत्यादी माध्यमांतूनही बांधकाम दुरुस्तीची कामे केली जातात.

वित्त विभागाने शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्या आकृतीबंधातून मुख्याध्यापकांची गट-ब संवर्गातील ३५६ पदे रद्द करण्यास मान्यता दिली आहे. तसेच, ग्रामविकास विभागाने मुख्याध्यापक गट-क संवर्गात पदनिर्मितीचा प्रस्ताव समर्थनासह वित्त विभागास सादर करण्याचे अभिप्राय दिले होते. त्यास ग्रामविकास विभागाने सहमती दर्शविली असून मुख्याध्यापक गट-क ची पदे निर्माण करण्याबाबतची नस्ती ग्रामविकास विभागास सादर करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील २० टक्के शिक्षकांनाच निवड वेतनश्रेणी देण्याची अट ठेवल्याबाबत

**(५) * २३८३४ ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्री.रमेशदादा पाटील, श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे, श्रीमती उमा खापरे, श्री.विक्रम काळे, श्री.चंद्रशेखर बावनकुळे, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.निलय नाईक, प्रा.राम शिंदे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात एकाच वेतनश्रेणीत सेवेची १२ वर्षे पूर्ण झालेल्या शिक्षकांना वरिष्ठ वेतनश्रेणी आणि २४ वर्षे पूर्ण झालेल्या शिक्षकांना निवड वेतनश्रेणी लागू करण्यात येत असल्याचे माहे मार्च, २०२३ च्या शेवटच्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने एकूण पात्र शिक्षकांपैकी केवळ २० टक्के शिक्षकांनाच निवडश्रेणी देण्याची अट ठेवल्याने उर्वरित ८० टक्के शिक्षकांवर अन्याय होणार असून, समान काम समान वेतन या कायद्याची जाणीवपूर्वक पायमल्ली होत असल्याचा आरोप शिक्षकांनी केला असून निवड श्रेणीसाठी आवश्यक इतर सर्व निकष पूर्ण करून केवळ २० टक्के शिक्षकांना निकषाची ठेवण्यात आलेली अट अन्यायकारक असल्याने असंख्य शिक्षक निवडश्रेणी पासून वंचित राहणार आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर अट रद्द करून सरसकट सर्व शिक्षकांना विनाअट निवड वेतनश्रेणी लागू करण्याबाबत कोणती कार्यवाही / उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिपक केसरकर :** (१) हे खरे आहे.

(२) याबाबत संघटनांची निवेदने प्राप्त आहेत.

(३) याबाबत संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), पुणे, यांच्याकडून आर्थिक भार मागविण्यात आलेला असून तो प्राप्त झाल्यानंतर वित्त विभागाकडे सदर प्रस्ताव पाठविण्याची बाब नियोजित आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात खाजगी विद्यापीठांना परराज्यात केंद्र सुरू करता येणार असल्याबाबत

**(६) * २३३२८ श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे, श्रीमती उमा खापरे, ॲड.निरंजन डावखरे, श्री.रमेशदादा पाटील, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील खाजगी विद्यापीठांना लवकरच परराज्यात केंद्र (ऑफ कॅम्पस) सुरू करून आपले कार्यक्षेत्र विस्तारता येणार असून याकरीता विद्यापीठ अनुदान आयोगाची (युजीसी) मान्यता आणि संबंधित राज्याचे ना-हरकत प्रमाणपत्र विद्यापीठांना घ्यावे लागणार असल्याचे माहे मार्च, २०२४ च्या दुसऱ्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, युजीसी (खाजगी विद्यापीठांमध्ये मानांकाची स्थापना आणि देखभाल) नियमावली २००३ नुसार, सदर परवानगी राबविण्याचा निर्णय यूजीसीने दिनांक १३ फेब्रुवारी, २०२४ रोजी झालेल्या ५७७ व्या बैठकीत घेतला असून, त्या संबंधातील अधिसूचना प्रकाशित करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या विद्यापीठांना त्याच ट्रस्ट किंवा कंपनी अंतर्गत चालविले जाणारे कोणतेही संलग्नित महाविद्यालय ताब्यात घेऊन केंद्र (ऑफ कॅम्पस) स्थापन करता येऊ शकते तसेच परराज्यात खाजगी विद्यापीठांची स्थापना करण्यासाठी शासनाने कोणत्या अटी व शर्ती लागू केल्या आहेत,
(४) असल्यास, परराज्यात खाजगी विद्यापीठांची स्थापना केल्यास त्याचा राज्यातील विद्यापीठावर परिणाम होणार नाही या अनुषंगाने कोणती उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे काय,
(५) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय ?

**श्री.चंद्रकांत (दादा) पाटील :** (१) व (२) अंशत: खरे आहे.
(३) खाजगी विद्यापीठ ज्या राज्यात अस्तित्वात आहे त्याच राज्याच्या परिक्षेत्रात केंद्र (ऑफ कॅम्पस) स्थापन करण्याची तरतुद विद्यापीठ अनुदान आयोगाने दिनांक ५ मार्च, २०२४ च्या सार्वजनिक सूचनेत नमूद केलेले आहे.

राज्यात खाजगी विद्यापीठांनी ऑफ कॅम्पस स्थापन करण्यासाठीच्या अटी व शर्ती शासनाने अद्याप विहित केलेल्या नाहीत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबईतील शासकीय निवासस्थानांच्या दुरुस्ती आणि नुतनीकरणाची कामे कागदोपत्री दाखवून बोगस देयकांच्या आधारे कोट्यवधी रुपयांचा गैरव्यवहार केल्याबाबत

**(७) * २२९२३ श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अंतर्गत मुंबई शहर इलाखा विभागाने मंत्र्यांच्या निवासस्थानांची देखभाल-दुरुस्ती, फर्निचर खरेदीची कामे कागदोपत्री दाखवून बोगस देयकांच्या आधारे कोट्यवधी रुपयांचा गैरव्यवहार केला असल्याचे दिनांक १२ एप्रिल, २०२४ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर कंत्राटदारांना देयकांचे पैसे मंजूर करताना सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांनी वीज, पाणी देयकासाठी पैसे अदा केल्याचे दर्शविले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने मुंबईतील शासकीय निवासस्थानांच्या दुरुस्ती आणि नुतनीकरणाची कामे कागदोपत्री दाखवून बोगस देयकांच्या

आधारे कोट्यवधी रुपयांचा गैरव्यवहार करणाऱ्या संबंधित कंत्राटदार / अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.रविंद्र चव्हाण :** (१) खरे नाही.

परंतु दिनांक १३/०३/२०२४ रोजीच्या दैनिक लोकमत वृत्तपत्रात "वीज, पाणीबील आणि पैसे कंत्राटदारांच्या खात्यात" या शिर्षकाखाली बातमी आली होती.
(२) हे अंशत: खरे आहे.
(३) दिनांक १३/०३/२०२४ रोजीच्या दैनिक लोकमत वृत्तपत्रात "वीज, पाणीबील, आणि पैसे कंत्राटदारांच्या खात्यात" या शिर्षकाखाली बातमीच्या अनुषंगाने शासनाने अधीक्षक अभियंता, दक्षता व गुण नियंत्रण मंडळ, नाशिक यांना चौकशीचे निर्देश दिले आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## वणी, रंभापूर (ता.जि.अकोला) सह अनेक गावांमधील मोठ्या प्रमाणात उत्पादीत सोयाबीन पीकाला दरवाढ मिळण्याबाबत

**(८) * २३९१४ श्री.अमोल मिटकरी, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वणी, रंभापूर (ता.जि.अकोला) सह अनेक गावांमध्ये शेतकऱ्यांनी खरीप हंगामात सोयाबीन पिकाचे उत्पादन घेतले असून, सोयाबीन पिकाला योग्य दर न मिळाल्याने बहुतांश शेतकऱ्यांनी दरवाढीच्या अपेक्षेने घरांमध्ये सोयाबीन साठवून ठेवले असल्याचे माहे मे, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, माहे जानेवारी, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान सोयाबीनच्या दरात वाढ होण्याची अपेक्षा शेतकऱ्यांना असताना दरांमधील अस्थिरता तसेच अपेक्षित दर न मिळल्याने शेतकऱ्यांनी घरातील लग्नकार्य, मुलांचे शिक्षण तसेच इतर कारणांसाठी बँकेतून मोठ्या प्रमाणात कर्ज घेतल्याने कर्जाचा बोजा वाढत चालला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी सोयाबीन दरात वाढ व अपेक्षित दर मिळण्याच्यादृष्टीने शासनस्तरावर कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अब्दुल सत्तार :** (१), (२) व (३) हंगाम २०२३-२४ मध्ये केंद्र शासनाने सोयाबीनचा आधारभुत दर प्रति क्विंटल ४६००/- निश्चित केला. केंद्रीय कृषी मंत्रालयाने सन २०१८ मध्ये दिलेल्या मार्गदर्शक सुचनांनुसार एकूण उत्पादनाच्या २५% मर्यादेत ११.४३ लाख मेट्रीक टन सोयाबीनची हमीभावाने खरेदीस मान्यता दिली. त्यानुसार राज्यात दिनांक ०९/११/२०२३ पासून सोयाबीन खरेदी करीता शेतकरी नोंदणी व खरेदी प्रक्रिया सुरु करण्यात आली होती व ९० दिवसाच्या कालावधीनुसार अंतिम मुदत दिनांक ०६/०२/२०२४ पर्यंत होती. उक्त कालावधीत प्रचलित बाजारभाव हे किमान आधारभुत दरापेक्षा जास्त असल्याने शेतकऱ्यानी खरेदी प्रक्रियेस प्रतिसाद दिला नाही.

माहे फेब्रुवारी, २०२४ मध्ये सोयाबीनचे दर कमी झाल्याने किमान आधारभुत दराने खरेदीकरीता शेतकरी व लोकप्रतिनिधींची मागणी विचारात घेवून केंद्र शासनाने मान्यता दिल्यानंतर खरेदी प्रक्रियेस दिनांक २८/०३/२०२४ पासून ३० दिवस मुदतवाढ देण्यात आली. त्यासाठी एकूण २५५ खरेदी केंद्र सुरु करण्यात आले. परंतु सदर कालावधीमध्ये सोयाबीनचे पुन्हा बाजारभाव किमान आधारभूत दरापेक्षा जास्त झाल्यामुळे खरेदी झालेली नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही

-----------------

## पारडी (ता.मोर्शी, जि.अमरावती) येथे संत्रा प्रक्रिया प्रकल्प उभारण्याबाबत

**(९) * २४०६० श्री.निलय नाईक, श्रीमती उमा खापरे : तारांकित प्रश्न क्रमांक २१७११ ला दिनांक १४ डिसेंबर, २०२३ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर, काटोल, कळमेश्वर (जि.नागपूर), मोर्शी (जि.अमरावती) येथे शेतीच्या शाश्वत विकासासाठी, शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविण्याच्यादृष्टीने फळ पिकांच्या उत्पादनापासून ते मुल्यवर्धनापर्यंतची प्रक्रिया, एकात्मिक पीक आधारित प्रकल्प आराखडा तयार करून आधुनिक संत्रा प्रक्रिया केंद्रे उभारण्याकरीता २० कोटी रूपये उपलब्ध करून देण्याची घोषणा मा.वित्त मंत्री यांनी दिनांक ९ मार्च, २०२३ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पारडी (ता.मोर्शी, जि.अमरावती) या गावात सुमारे ७२ कोटी रुपयांची गुंतवणूक करून संत्रा प्रक्रिया प्रकल्प उभारण्यात येणार असून शासनाने केलेल्या घोषणेच्या अनुषंगाने नागपूर, अमरावती व बुलढाणा जिल्ह्यात प्राथमिक प्रक्रिया केंद्र (८ केंद्र), दुय्यम प्रक्रिया केंद्र (१६ केंद्र) व उपपदार्थावरील प्रक्रिया प्रकल्प (५ केंद्र) असे एकूण २९ आधुनिक संत्रा प्रक्रिया केंद्र उभारणेबाबतच्या प्रस्तावास दिनांक ८ नोव्हेंबर, २०२३ रोजी शासनाने मान्यता दिली आहे, हे ही,खरे आहे काय,
(३) असल्यास, त्यानुषंगाने उपरोक्त ठिकाणी आधुनिक संत्रा प्रक्रिया केंद्रे सुरू करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे व याबाबतची सद्य:स्थिती काय आहे,
(४) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री.अब्दुल सत्तार :** (१) होय, हे खरे आहे.
(२) मा.मंत्रीमंडळाच्या दिनांक ०८ नोव्हेंबर, २०२३ रोजीच्या बैठकीत मान्यता दिल्यानुसार नागपुर, काटोल व कळमेश्वर, जि.नागपूर, मोर्शी, जि.अमरावती व संग्रामपूर, जि.बुलढाणा येथे ८ प्राथमिक प्रक्रिया प्रकल्प (अंदाजित किंमत रुपये ४.०० कोटी.), १६ दुय्यम प्रक्रिया प्रकल्प (अंदाजित किंमत रुपये ४०.०० लक्ष) व ५ उपपदार्थावरील प्रक्रिया प्रकल्प (अंदाजित किंमत रुपये ३०.०० लक्ष) असे एकूण २९ आधुनिक संत्रा प्रक्रिया केंद्रे उभारण्यासाठी प्रकल्पपूर्तीनंतर ५० टक्के शासन अनुदान देण्यासाठी रुपये २०.०० कोटी रकमेच्या योजनेस दिनांक २७ डिसेंबर, २०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे. मात्र, पारडी, ता.मोर्शी, जि.अमरावती येथे सुमारे ७२ कोटी रुपयांची गुंतवणूक करून संत्रा प्रक्रिया प्रकल्प उभारण्याचा प्रस्ताव विभागास प्राप्त झालेला नाही. तथापि, वरुड-मोर्शी, जि.अमरावती येथे संत्रा प्रक्रिया प्रकल्प उभारण्याबाबत तयार केलेल्या फिजिबीलीटी अहवालास शासनाने मान्यता दिली आहे.

(३) दिनांक २७ डिसेंबर, २०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये मान्यता दिल्यानुसार आधुनिक संत्रा प्रक्रिया केंद्र उभारणे या योजनेच्या अंमलबजावणीसाठी महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळामार्फत नियुक्त केलेल्या सल्लागाराकडून मॉडेल प्रकल्प अहवाल तयार करण्याचे काम सुरु आहे.
(४) प्रश्न उद्‍भवत नाही.

-----------------

## म्हसळा (जि.रायगड) येथील घोणसे घाटातील रस्त्याची दुरवस्था झाल्याबाबत

**(१०) * २४१७२ श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) म्हसळा (जि.रायगड) येथील घोणसे घाटातील वाढत्या अपघातांवर आळा घालण्याकरीता एमएसआरडीसीच्या १२ अधिकाऱ्यांनी दिनांक १४ ऑक्टोबर, २०२३ रोजी पाहणी दौरा केला असून अद्याप या दौऱ्याचा अहवाल जिल्हाधिकाऱ्यांना सादर केला नसल्याचे माहे एप्रिल, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पुणे - दिघी राष्ट्रीय महामार्ग व माणगाव - दिघी मार्गावरील केळेवाडी परिसरातील घोणसे घाटातील तीव्र उतारावरील रस्त्यांवर खड्डे पडून रस्त्याची दुरवस्था झाली असल्याने अनेक अपघात होत असून तेथील नागरिकांनी सदर रस्त्याची दुरुस्ती करण्याबाबत निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर पाहणी दौऱ्याचा अहवाल जिल्हाधिकाऱ्यांना उपलब्ध करुन न देणाऱ्या संबंधित जबाबदार दोषी अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली तसेच घोणसे घाटातील दुरवस्था झालेल्या रस्त्याची दुरुस्ती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे :** (१) हे अंशत: खरे आहे.
घोणसे घाटातील वाहतूक सुरक्षेबाबत केलेल्या उपाययोजनांचा अहवाल महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने दिनांक १७/०५/२०२३ रोजीच्या पत्रान्वये उपविभागीय अधिकारी, श्रीवर्धन, जि.रायगड यांना सादर केला आहे.
(२) हे खरे नाही.
पुणे दिघी राष्ट्रीय महामार्ग व माणगाव दिघी राष्ट्रीय महामार्गावरील केळेवाडी परिसरातील घोणसे घाटात १४ मीटर रुंदीत कॉंक्रीटीकरणाचे काम पूर्ण झाले आहे. त्यामुळे रस्त्याची दुरावस्था झाली असल्याने अपघात होत आहेत हे खरे नाही.
(३) घोणसे घाटातील वाहतूक सुरक्षेबाबत केलेल्या उपाययोजनांचा अहवाल महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने दिनांक १७/०५/२०२३ रोजीच्या पत्रान्वये उपविभागीय अधिकारी, श्रीवर्धन, जि.रायगड यांना सादर केला असल्याने प्रश्न उद् भवत नाही. सदर घाट रस्त्याचे देखभाल व दुरुस्तीचे काम नियुक्त ठेकेदाराकडून करण्यात येवून रस्ता वाहतुकीस सुस्थितीत ठेवण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्‍भवत नाही.

-----------------

## चातारी (ता.उमरखेड, जि.यवतमाळ) येथील जिल्हा परिषदेच्या शाळेतून विद्यार्थ्यांना वितरीत करण्यात आलेल्या मिलेटस् चॉकलेटमध्ये अळया आढळून आल्याबाबत

**(११) * २४३०८ श्री.श्रीकांत भारतीय :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चातारी (ता.उमरखेड, जि.यवतमाळ) येथील जिल्हा परिषदेच्या शाळेतून विद्यार्थ्यांना पोषण आहार म्हणून माहे जानेवारी- फेब्रुवारी, २०२४ मध्ये वितरीत करण्यात येणारी मिलेटस् चॉकलेटस् शाळांना माहे एप्रिल, २०२४ मध्ये प्राप्त झाली असून, सदर मिलेटस् चॉकलेटमध्ये अळया आढळून आल्या असल्याचे माहे मे, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने पोषण आहारामध्ये देण्यात येणाऱ्या मिलेटस् चॉकलेटसचा शाळांना विलंबाने पुरवठा करणाऱ्या संबंधित दोषी कंत्राटदार व अधिकारी यांचेविरुध्द कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिपक केसरकर :** (१) अंशत: खरे आहे.

प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजनेंतर्गत सन २०२३-२४ या वर्षामध्ये राज्यातील आदिवासी व आकांक्षित जिल्ह्यातील विद्यार्थ्यांना नाविण्यपूर्ण उपक्रमांतर्गत मिलेट न्युट्रिटिव्ह बार उपलब्ध करुन देण्यात येत आहेत.

जिल्हा परिषद प्राथमिक कन्या शाळा, चातारी ता.उमरखेड जि.यवतमाळ या शाळेतील वाटप करण्यात आलेल्या मिलेट बारमध्ये अळया असल्याची बातमी वृत्तपत्र व न्यूज चॅनेलवर प्रसिध्द झाली होती. त्यानुषंगाने चौकशी दरम्यान सदर शाळेतील सर्व प्रकारच्या मिलेट बारची तपासणी केली असता त्यामध्ये काहीही आढळले नाही. तसेच, सदर शाळेतील मिलेट बारचे नमुने तपासणीसाठी दोन प्रयोगशाळेमध्ये पाठविण्यात आले होते. सदर प्रयोगशाळेकडील अहवाल समाधानकारक आहेत.

(२) यवतमाळ जिल्ह्यात मिलेट न्युट्रिटिव्ह बार संबंधित पुरवठेदारामार्फत वितरीत करण्यास विलंब झालेला आहे. मिलेट बारचा पुरवठा करणाऱ्या संबंधित पुरवठेदारावर करारनाम्यातील तरतूदीनुसार विलंबाने पुरवठा केल्याबाबत रुपये ३,२३,४१८/- इतका दंड देयकातून कपात करण्याचे प्रस्तावित आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पत्रादेवी-बांदा (ता.सावंतवाडी, जि.सिंधुदुर्ग) ते दिग्रज (जि.वर्धा) दरम्यान बांधण्यात येणाऱ्या शक्तीपीठ महामार्गाबाबत

**(१२) * २४३७६ श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.राजेश राठोड, श्री.अभिजित वंजारी, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.जयंत आसगावकर :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात नव्याने शक्तीपीठ महामार्ग बांधण्यात येणार असून पत्रादेवी-बांदा (ता.सावंतवाडी,जि.सिंधुदुर्ग) ते दिग्रज (जि.वर्धा) असा ८०५ कि.मी. लांबीच्या मार्गासाठी रुपये ८६ हजार कोटी खर्च करण्यात येणार आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर महामार्गासाठी १२ जिल्हयांतील २७ हजार ५०० एकर जमीन संपादीत करण्यात येणार असून, हजारो शेतकरी भूमीहिन होणार असल्याने १२ जिल्हयांतील हजारो शेतकरी विरोध करीत असून दिनांक १८ जून, २०२४ रोजी त्याविरोधात कोल्हापूर जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा आंदोलन करण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, गत चार वर्षापासून रत्नागिरी-नागपूर महामार्गाचे काम सुरु असून तीर्थक्षेत्रे जोडण्यासाठी पुन्हा नव्याने पत्रादेवी-बांदा (ता.सावंतवाडी, जि.सिंधुदुर्ग) ते दिग्रज (जि.वर्धा) या शक्तीपीठ महामार्गाला मंजूरी देण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदरहू महामार्गाच्या निर्मितीबाबत शासनाची नेमकी भूमिका काय आहे ?

**श्री.दादाजी भुसे :** (१) प्रस्तावित शक्तीपीठ महामार्गाची लांबी ८०२.५९२ किमी असून ठोबळ मानाने प्रकल्पाचा भूसंपादनासह अपेक्षित खर्च रुपये ८६३५८ कोटी आहे.
(२) होय, हे अंशतः खरे आहे.

सदर महामार्गासाठी एकूण १२ जिल्ह्यांमधील साधारणतः ९३८५.३६ हेक्टर (२३१८२ एकर).जमीन संपादित करावी लागणार आहे.

महामार्गाच्या कोल्हापूर, सांगली जिल्ह्यातील आखणीमुळे काही शेतकरी भूमिहीन होणार असल्याची निवेदने महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाला प्राप्त झाली आहेत.

कोल्हापूर जिल्ह्यातील शेतकरी सदर महामार्गास विरोध करत असून दिनांक १८ जून, २०२४ रोजी कोल्हापूर जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढला होता.
(३) होय, हे अंशतः खरे आहे.

महाराष्ट्र शक्तीपीठ महामार्गाची आखणी शासन निर्णय दिनांक ०७/०२/२०२४ अन्वये अंतिम केली असून, सदर महामार्गाचा विकास महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळामार्फत हाती घेण्यास शासनाने मान्यता दिली आहे.
(४) शेतकऱ्यांच्या निवेदनांबाबत सर्वकष विचार करुन, तसेच प्रत्यक्ष परिस्थितीचा आढावा घेऊन शेतकरी / भूधारक यांना विश्वासात घेण्यात येईल. त्यानंतरच सदर प्रकल्पाच्या भूसंपादन प्रकरणी शेतकऱ्यांचे / भूधारकांचे नुकसान होणार नाही, या दृष्टीने शासन पुढील योग्य तो निर्णय घेईल.

-----------------

## राज्यात सुगंधित तंबाखू, तंबाखू मिश्रीत गुटखा यांची विक्री होत असल्याबाबत

**(१३) * २३७६७ श्री.सत्यजीत तांबे, श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात तंबाखू व तंबाखू मिश्रीत पदार्थ विक्रीवर शासनाने बंदी घातली असतानाही विविध कंपन्या सुगंधित तंबाखू, तंबाखू मिश्रीत गुटखा यांची सर्रासपणे विक्री करीत असून गुजरात, मध्य प्रदेश, छत्तीसगड राज्यातून गुटख्याची अवैधपणे तस्करी केली जात असल्याचे माहे मार्च, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तरुण युवकांसोबत महिला व विद्यार्थीदेखील गुटख्याच्या आहारी जात असून आरोग्याच्या गंभीर समस्या निर्माण झाल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन तंबाखू मिश्रीत पदार्थ, गुटखा उत्पादन करणाऱ्या तसेच विक्री करणाऱ्या संबंधितांविरुध्द कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे तसेच अवैध तंबाखू, गुटखा तस्करी पूर्णपणे थांबविणेबाबत उपाययोजना करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.धर्मरावबाबा आत्राम :** (१) व (२) हे अंशत: खरे आहे.
(३) तंबाखू मिश्रीत पदार्थ, गुटखा उत्पादन करणाऱ्या तसेच विक्री करणाऱ्या संबंधितांवर अन्न सुरक्षा व मानके कायदा, २००६ व नियम २०११ मधील तरतुदींनुसार कारवाई करण्यात येते.

गुटखा, पानमसाला व इतर तत्सम प्रतिबंधित अन्नपदार्थांच्या वाहतूकीसाठी व साठवणूकीसाठी पुनर्वापर न होण्याकरीता सदर वाहन जप्त करण्याबाबत तसेच, सदर जागा/गोदाम सील करण्याबाबतचे निर्देश आयुक्त, अन्न व औषध प्रशासन यांच्या दिनांक ०६/०४/२०१७ रोजीच्या ज्ञापनान्वये देण्यात आले आहेत.

गुटखा, पानमसाला व इतर तत्सम प्रतिबंधित अन्न पदार्थाची वाहतूक करणाऱ्या वाहनांचा वाहतूकीचा परवाना तसेच वाहन चालकाचा परवाना रद्द करणेबाबत संबंधित प्रादेशिक परिवहन प्राधिकरणाला सूचित करण्याबाबतचे निर्देश आयुक्त, अन्न व औषध प्रशासन यांच्या दिनांक १२/०९/२०१८ रोजीच्या परिपत्रकान्वये देण्यात आले आहेत.

तसेच, गृह विभाग, शासन निर्णय, दिनांक १७/०९/२०२१ अन्वये गुटखा, पान मसाला व इतर तत्सम प्रतिबंधित अन्न पदार्थाचे उत्पादन, विक्री, वितरण, साठवणूक व वाहतूक करणाऱ्या व्यक्तीविरुध्द कारवाई करण्यासाठी अन्न व औषध प्रशासनाच्या अधिकारी/कर्मचारी यांना आवश्यक ते सहकार्य करणेबाबत व धाडी/जप्तीच्या कारवाई करण्यामध्ये सक्रिय सहभाग घेण्याबाबत संबंधित पोलीस घटकांना सूचित करण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबई विद्यापीठाची पीएच.डी. प्रवेशपूर्व परीक्षा घेण्याबाबत

**(१४) * २३८३५ ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्री.रमेशदादा पाटील :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई विद्यापीठाच्या संशोधन केंद्रामध्ये पीएच.डी.च्या प्रवेशपूर्व परीक्षेची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांची दीड वर्षानंतरही पीएच.डी. प्रवेशपूर्व परीक्षा घेण्यात न आल्याने हजारो विद्यार्थी पीएच.डी. प्रवेशापासून वंचित राहत असल्याची बाब माहे मार्च, २०२४ च्या दुसऱ्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वर्षातून एकदा पीएच.डी. प्रवेशपूर्व परीक्षा (पेट) घेणे अपेक्षित असतानाही मागील दीड वर्षांपासून विद्यापीठाने परीक्षा घेतली नसल्याने पीएच.डी.साठी तयारी करणारे विद्यार्थी संभ्रमात पडले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मुंबई विद्यापीठातील पीएच.डी. प्रवेशपूर्व परीक्षा तात्काळ घेण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही व उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत (दादा) पाटील :** (१) व (२) हे खरे नाही.
मुंबई विद्यापीठाकडून पीएच.डी. प्रवेशाकरीता प्रवेशपुर्व (पेट) परीक्षेचे आयोजन शैक्षणिक वर्षात एकदा करण्यात येते. शैक्षणिक वर्ष २०२२-२३ साठी मुंबई विद्यापीठाची पेट परीक्षा माहे ऑगस्ट, २०२२ मध्ये घेण्यात आली होती. शैक्षणिक वर्ष २०२३-२४ साठी पेट परीक्षा घेण्यासंबंधीची प्रशासकीय प्रक्रिया माहे मार्च, २०२४ मध्ये मुंबई विद्यापीठाकडून सुरु करण्यात आली असून सद्य:स्थितीत सुरु असलेल्या तांत्रिक प्रक्रिया पूर्ण करुन पेट परीक्षा घेण्याची कार्यवाही विद्यापीठाकडून करण्यात येत आहे.
(३) मुंबई विद्यापीठामार्फत कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## उरण एज्युकेशन सोसायटी या इंग्रजी माध्यमाच्या शाळा व्यवस्थापनाने अतिरिक्त शुल्क न भरणाऱ्या शेकडो विद्यार्थ्यांचा वार्षिक निकाल देण्यास नकार दिल्याबाबत

**(१५) * २४२३६ श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) उरण एज्युकेशन सोसायटी (युईएस) या इंग्रजी माध्यमाच्या शाळेत इयत्ता १ ली ते १२ वी पर्यंत तीन हजार विद्यार्थी शिक्षण घेत असून यामध्ये गरीब व श्रीमंत विद्यार्थ्यांचा समावेश आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उरण एज्युकेशन सोसायटी या इंग्रजी माध्यमाच्या शाळा व्यवस्थापनाने ओळखपत्र, डायरी, ई-लर्निंगचे अतिरिक्त शुल्क न भरणाऱ्या शेकडो विद्यार्थ्यांचा वार्षिक निकाल देण्यास नकार दिला असल्याचे दिनांक २ मे, २०२४ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, चौकशीच्या अनुषंगाने विद्यार्थ्यांचे निकाल देण्यास नकार देवून विद्यार्थ्यांवर अन्याय करणाऱ्या शाळा व्यवस्थापनाविरुध्द कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिपक केसरकर :** (१) हे खरे आहे.
(२) व (३) हे अंशत: खरे आहे.

प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने अतिरिक्त शुल्क आकारण्यात येऊ नये व कोणत्याही विद्याथ्यांचे निकाल पत्र रोखले जाऊ नये अशा सूचना संबंधित शाळेला दिलेल्या आहेत. त्यानुसार संबंधित शाळा व्यवस्थापनाने कोणत्याही विद्यार्थ्यांचे वार्षिक निकाल थांबविले नाहीत असे कळविले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही

-----------------

## मुंबई शहर आणि उपनगरातील आरटीई प्रवेशासाठी टाळाटाळ करणाऱ्या शाळांवर कारवाई करण्याबाबत

**(१६) * २४०६७ श्री.निलय नाईक, श्रीमती उमा खापरे :** सन्माननीय **अल्पसंख्यांक विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अल्पसंख्याक दर्जा घेतलेल्या संस्था मोठ्या प्रमाणात शासकीय लाभ घेऊन शिक्षण हक्क अधिकारातील शिक्षणाचा मूलभूत अधिकार नाकारुन (आरटीई प्रवेश नाकारुन) नफेखोरी करणाऱ्या शाळांना राज्य बालहक्क संरक्षण आयोगाने अल्पसंख्याक दर्जाच्या शाळांची तपासणी शालेय शिक्षण विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांमार्फत करण्यात यावी असे निदेश दिले असल्याचे माहे एप्रिल, २०२४ च्या दुसऱ्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, भाषिक, धार्मिक अल्पसंख्याक दर्जा घेतलेल्या बहुतांश शाळा या शिक्षण हक्क अधिकार नाकारत असल्याने राज्य बालहक्क संरक्षण आयोगाचे अध्यक्ष यांनी शालेय शिक्षण विभागाच्या उच्चस्तरीय अधिकाऱ्यांमार्फत बैठक घेऊन त्या बैठकीत मुंबई शहर आणि उपनगरातील अल्पसंख्याक शाळांमधून आरटीई प्रवेशासाठी टाळाटाळ करणाऱ्या शाळांवर कारवाई करण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने भाषिक आणि धार्मिक अल्पसंख्याक विद्यार्थी नसतानाही अल्पसंख्याक दर्जा घेतलेल्या व नियमाचे पालन न करणाऱ्या शाळांची तपासणी करून त्यांच्याविरुध्द कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अब्दुल सत्तार :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) अल्पंसख्याक विकास विभाग, शासन निर्णय, क्रमांक: अशैसं २०१२/प्र.क्र.२१/का.५, दिनांक २७/०५/२०१३ मधील अटी व शर्तींचे उल्लंघन करणाऱ्या शैक्षणिक संस्थांची सक्षम प्राधिकारी यांचेकडून आढावा घेण्यात आलेला असून आतापर्यंत राज्यातील ३२ शैक्षणिक संस्थांचे अल्पसंख्याक दर्जा प्रमाणपत्र सक्षम प्राधिकारी यांनी रद्द केलेले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मंडणगड तालुक्यातील बाणकोट बागमांडला सागरी सेतूचे काम अपूर्णावस्थेत असल्याबाबत

**(१७) * २४१७३ श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रेवस - रेड्डी सागरी महामार्गावर उभारण्यात येत असलेल्या तसेच रत्नागिरी व रायगड जिल्ह्यांना जोडणारा मंडणगड तालुक्यातील बाणकोट बागमांडला या सागरी पुलाच्या कामाला सन २०१३ मध्ये

प्रत्यक्ष सुरुवात झाली असून सदर काम गत दहा वर्षांपासून अपूर्णावस्थेत असल्याचे माहे एप्रिल, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर पुलाचे काम अपूर्णावस्थेत असल्यामुळे कोकण किनारपट्टीतील अनेक गावांचा विकास प्रलंबित असून बाणकोट बागमांडला सी लिंकचे अपूर्णावस्थेत असलेले काम लवकरात लवकर पूर्ण करून कोकणाचा विकास होण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती उपाययोजना व कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.रविंद्र चव्हाण :** (१) हे खरे आहे.
(२) बाणकोट पुलाचे बांधकाम पुन:श्च सुरु करण्याच्या दृष्टीने सदर खाडीपुलाच्या झालेल्या कामाचे Structural Audit शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, पुणे यांच्यामार्फत करण्यात आले असून त्यांचा अहवाल प्राप्त झाला आहे. सदर अहवालात नमूद निष्कर्षाच्या अनुषंगाने कंत्राटदाराने याबाबत वीरमाता जिजाबाई ट्रेक्नोलॉजिकल इन्स्टीटयुट (VJTI), माटुंगा, मुंबई यांचा अभिप्राय घेणेबाबत विनंती केली असून त्यानुसार VJTI मार्फत कार्यवाही प्रगतीत आहे. वीरमाता जिजाबाई ट्रेक्नोलॉजिकल इन्स्टीटयुट यांच्याकडून अभिप्राय प्राप्त झाल्यावर सदर खाडीपुलाचे बांधकामाबाबत पुढील योग्य ती कार्यवाही करण्याचे प्रस्तावित आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्याचे शैक्षणिक धोरण ठरविण्याबाबत

**(१८) * २४३६५ श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात सार्वत्रिक आणि गुणवत्तापूर्ण शालेय शिक्षण देण्याबरोबरच संविधानातील उद्दिष्ट आणि मुल्ये यांच्याशी सुसंगत शैक्षणिक धोरण ठरवावे आणि श्वेतपत्रिका काढून ते जाहीर करावे, अशी मागणी शिक्षणक्षेत्रात काम करणाऱ्या ५६ नामवंत व्यक्तींनी मा.शालेय शिक्षण मंत्री महोदयांकडे दिनांक ९ मार्च, २०२४ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शिक्षण क्षेत्रातील तज्ञ आणि अनुभवी व्यक्ती आणि सेवाभावी संस्था यांच्या मदतीने शैक्षणिक धोरण ठरविण्यात यावे, तसेच नफ्यासाठी काम करणाऱ्या कॉर्पोरेटस (खाजगी) कंपन्यांना या कामाचे कंत्राट देण्यात येवू नये, अशी मागणीही संबंधित व्यक्तींनी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शिक्षण क्षेत्रातील तज्ञ आणि अनुभवी व्यक्ती आणि सेवाभावी संस्था यांच्या मदतीने शैक्षणिक धोरण ठरविण्याबाबत शासनाने कोणता धोरणात्मक निर्णय घेतला आहे वा घेण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिपक केसरकर :** (१) अशा प्रकारच्या निवेदनाची प्रत आढळून आली नाही.
(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील शिधापत्रिकाधारकांना आनंदाचा शिधा व स्वस्त आणि मोफत धान्य उपलब्ध करून देण्याबाबत

**(१९) * २४०९० श्री.निलय नाईक, श्रीमती उमा खापरे, श्री.रमेशदादा पाटील, श्री.प्रसाद लाड, श्री.प्रवीण दटके, श्री.रमेश कराड, प्रा.राम शिंदे :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सर्व नागरिकांना शिधापत्रिका उपलब्ध करून सर्व शिधापत्रिकाधारकांना स्वस्त दरात धान्य पुरविणे ही शासनाची मूळ संकल्पना असूनही लाखो शिधापत्रिकाधारक हे धान्याविना वंचित राहत असल्याचे माहे एप्रिल, २०२४ च्या पहिल्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत पात्र शिधापत्रिकाधारकांना सन २०२४ च्या गुढीपाडवा, डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती इ. सणानिमित्त आनंदाचा शिधा वितरीत करण्याचा शासन निर्णय दिनांक १५ मार्च, २०२४ रोजी प्रसिध्द करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शिधापत्रिकाधारकांना विभक्त व नवीन शिधापत्रिका शासन देत असून त्यांना धान्य पुरविण्यासाठी धान्याच्या कोटयात वाढ (इष्टांक) करणे आवश्यक असतानाही धान्याच्या कोटयात वाढ करून देण्यात न आल्याने अनेक शिधापत्रिकाधारकांना धान्य मिळत नसल्याने शिधापत्रिकाधारक आणि दुकानदारांमध्ये संघर्ष निर्माण होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, आनंदाचा शिधा देण्याबाबतची अंमलबजावणी करताना अंत्योदय अन्न योजना व प्राधान्य कुटुंब शिधापत्रिकाधारक तसेच छत्रपती संभाजीनगर व अमरावती विभागातील सर्व जिल्हे व नागपूर विभागातील वर्धा या १४ शेतकरी आत्महत्याग्रस्त जिल्ह्यांतील दारिद्रयरेषेवरील (एपीएल) केशरी शिधापत्रिकाधारक शेतकरी अशा एकूण १ कोटी ६९ लाख २४ हजार ६३७ शिधापत्रिका धारकांना आनंदाचा शिधा देण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सर्व प्रकारच्या शिधापत्रिकाधारकांना सदर योजनेचा लाभ देण्यात येत नसल्याने सर्वसामान्य नागरिक नाराजी व्यक्त करीत असून, महागाई नियंत्रणात आणून दारिद्रयरेषेखालील व मध्यमवर्गीय नागरिकांचा दर्जा सुधारण्यासाठी शिधापत्रिकाधारकांच्या उत्पन्नाची मर्यादा ८ लाख रुपयांपर्यंत वाढविण्यात येऊन ८ लाखापर्यंत उत्पन्न असणाऱ्या सर्व शिधापत्रिकाधारकांना सवलतीच्या दरात धान्य आणि केंद्राकडून मिळणारे मोफत धान्य उपलब्ध करून देण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने आठ लाख रुपयांपर्यंत उत्पन्न असणाऱ्या सर्व शिधापत्रिकाधारकांना सवलतीच्या दरात धान्य आणि मोफत धान्य व आनंदाचा शिधा उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.छगन भुजबळ :** (१) हे खरे नाही.

राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम, २०१३ अंतर्गत राज्यातील अंत्योदय अन्न योजना व प्राधान्य कुटूंबातील पात्र शिधापत्रिकाधारकांसाठी केंद्र शासनाने मंजूर केलेल्या नियतनाच्या मर्यादेत अन्नधान्याचे वितरण केले जाते.

(२) हे खरे आहे.

(३) हे खरे नाही.

(४) हे खरे आहे.

तथापि, सार्वत्रिक लोकसभा निवडणूक-२०२४ आदर्श आचारसंहिता लागु झाल्यामूळे, लक्ष्य निर्धारित सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत राज्यातील पात्र लाभार्थ्यांना गुढीपाडवा, डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती इ. सणांनिमित्त “आनंदाचा शिधा” शिधाजिन्नस संच वितरीत करण्यात आलेले नाहीत.

(५) व (६) शासन निर्णय दिनांक २९/०४/२०२४ अन्वये, राज्यातील प्राधान्य कुटुंब योजनेच्या ग्रामीण व शहरी लाभार्थ्यांसाठी सुधारित उत्पन्नाबाबतचे निकष तपासण्याकरीता नियंत्रक, शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई यांचे अध्यक्षतेखाली समितीची स्थापना करण्यात आलेली आहे. सदर समितीचा अहवाल अद्याप अप्राप्त आहे.

-----------------

## सिंधुदुर्ग रत्नागिरी या दोन जिल्ह्यांना जोडणाऱ्या दांडे - अणसुरे पुलाच्या दुरुस्तीचे काम अद्यापही अपूर्णावस्थेत असल्याबाबत

**(२०) * २४२४८ श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंधुदुर्ग - रत्नागिरी या दोन जिल्ह्यांना जोडणाऱ्या राजापूर तालुक्यातील सागरी महामार्गावरील दांडे - अणसुरे पूल बांधल्यापासून पाच वर्षातच पुलाचा काही भाग खचल्यामुळे तो धोकादायक झाल्याने माहे मार्च, २०२३ पासून हा पूल वाहतुकीसाठी बंद केला असल्याचे माहे मे, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पुलाच्या दुरुस्तीसाठी १० कोटी रुपये निधी उपलब्ध करुन दिला असून सदर पुलाच्या दुरुस्तीचे काम घारपुरे कन्स्ट्रक्शन या कंपनीला देण्यात आले असून सदरहू काम माहे फेब्रुवारी, २०२४ अखेर पूर्ण करण्याचे निश्चित करण्यात आले असतानाही दुरुस्तीचे काम गेले वर्षभर अत्यंत संथ गतीने सुरू असून अद्याप उक्त काम पूर्ण झालेले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर पुलाच्या दुरुस्तीचे काम अत्यंत संथ गतीने सुरु असल्याने वाहन चालक, नागरिक यांच्यासह विविध राजकीय पक्षांनी सार्वजनिक बांधकाम विभागाचे लक्ष वेधूनही प्रशासनाकडून त्याची गांभीर्याने दखल न घेतल्याने या कामाला गती प्राप्त झालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर पुलाच्या दुरुस्तीचे काम लवकरात लवकर पूर्ण करण्याच्यादृष्टीने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.रविंद्र चव्हाण :** (१) मार्च, २०२३ पासून पूलाच्या दुरुस्तीच्या कामाकरीता पूल वाहतूकीकरीता बंद करण्यात आला आहे हे खरे आहे.
(२), (३) व (४) पूलाच्या दुरुस्तीचे काम पूर्ण करण्यात आले आहे. सद्य:स्थितीत जोडरस्त्याचे काम प्रगतीत असून ऑक्टोबर, २०२४ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**विधान भवन :**
**मुंबई.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव (१) (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानपरिषद**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.